# मंत्रिमंडळ निर्णय

## २७ डिसेंबर २०१६

## ( बैठक क्र. १११ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | विजाभज, इमाव आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यास मान्यता | सामाजिक न्याय |
| २ | रमाई व शबरी घरकूल योजनेच्या अनुदानात वाढ करण्याचा निर्णय | सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास |
| ३ | प्रकल्पांना गायरान जमिनी देण्याबाबत शासनाच्या धोरणात सुधारणा | महसूल |
| ४ | भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने जमिनी इमारतीच्या बांधकामास मुदतवाढीसाठी शासनाचे धोरण निश्चित | महसूल |
| ५ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी प्रकल्पग्रस्तांना उपलब्ध करून देण्यास मान्यता | महसूल |
| ६ | नागपूर सुधार प्रन्यासच्या बरखास्तीस मान्यता | नगरविकास |
| ७ | दिग्रसच्या आठवले सूतगिरणीची अर्थसहाय्यासाठी निवड सूतगिरण्यांच्या मान्यतेसंदर्भात सुधारित धोरणासाठी वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन्याचे निर्देश | वस्त्रोद्योग |
| ८ | नर्सिंग अभ्यासक्रमासाठी नव्या पदांची नियुक्ती समितीद्वारे करण्यास मान्यता | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये |

## विजाभज, इमाव आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यास मान्यता

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या विभागाचे नामकरण -विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग विभाग॰ असे करण्यात आले आहे.

नवीन विभाग निर्मितीसाठी तीन महिन्यांचा संक्रमण कालावधी राहणार असून १ एप्रिल २०१७ पासून नवीन विभाग कार्यरत होणार आहे. या नवीन प्रशासकीय विभागामध्ये विशिष्ट कार्यालये व महामंडळे वर्ग करण्यात येणार आहेत. त्यामध्ये पुणे येथील विमुक्त जाती-भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग संचालनालय तसेच इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व त्यांची कार्यालये आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ व त्यांची कार्यालये यांचा समावेश आहे. या नवीन विभागासाठी स्वतंत्र सचिव आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांची मिळून एकूण ५१ पदे नव्याने निर्माण करण्यात येणार आहेत. या पदांसाठी अंदाजे वार्षिक २ कोटी २० लाख एवढा आवर्ती खर्च आणि १ कोटी ५० लाख इतका अनावर्ती खर्च अपेक्षित आहे. नवीन विभाग निर्मितीची रुपरेषा उच्चाधिकार समितीकडून ठरविण्यात येणार आहे. तसेच या विभागासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासही आज मान्यता देण्यात आली.

सन २०११ च्या जनगणनेनुसार या विभागांतर्गत येणाऱ्या विविध समाजसमुहाची अंदाजित लोकसंख्या ३ कोटी ६८ लाख ८३ हजार इतकी आहे. या समाजातील मुलांचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी व्हावे, मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, तसेच त्यांचा सामाजिक व सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांना मोफत निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य, क्रीडा व आरोग्य सुविधा पुरविण्यात येतील.

या नवीन विभागाकडून एकूण २४ योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यामध्ये विजाभज विद्यार्थ्यांना राज्य सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, इमाव विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, विमाप्र प्रवर्ग विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक सवलती, शिक्षण फी परीक्षा फी प्रदाने (विजाभज  आणि इमाव), राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती (इयत्ता ५ वी ते ७ वी आणि इयत्ता ८ वी ते १० वी), व्यावसायिक पाठ्यक्रमातील तसेच सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विजाभज आणि विमाप्र उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावतेन, माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (मुंबईसाठी), गुणवत्ता शिष्यवृत्ती (ग्रामीण क्षेत्र) आणि शिक्षण फी-परीक्षा फी, विजाभज विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा व निवासी कनिष्ठ महाविद्यालये, विद्यानिकेतन शाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थेस सहाय्यक अनुदान, ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान, विजाभज महिलांसाठी शिवणकला केंद्र चालविणे, वसंतराव नाईक तांडा सुधार योजना, वाहन चालक प्रशिक्षण योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आणि इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत राज्यात व बोर्डात प्रथम येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे अशा योजनांचा समावेश आहे.

-----o-----

सामाजिक न्याय आणि
आदिवासी विकास विभाग

**रमाई व शबरी घरकूल योजनेच्या**
**अनुदानात वाढ करण्याचा निर्णय**

राज्यातील ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द कुटुंबांना हक्काचे घर मिळावे यासाठी रमाई आवास योजना तसेच अनुसूचित जमातीतील कुटुंबांसाठी शबरी आवास योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार लाभार्थ्यांना साधारण क्षेत्रासाठी रुपये १ लाख ३२ हजार व नक्षलग्रस्त व डोंगराळ भागासाठी रुपये १ लाख ४२ हजार याप्रमाणे प्रति घरकूल अनुदान देण्यात येणार आहे.

ही घरकुले बांधताना त्यासोबतच शौचालयाच्या बांधकामासाठी या लाभार्थ्यांना रुपये १२ हजार एवढी प्रतिपूर्ती पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात येणार आहे. याशिवाय प्रधानमंत्री आवास योजनेमधील (ग्रामीण) लाभार्थ्यांना मनरेगा अभियानांतर्गत देण्यात येत असलेले अनुदान रमाई आवास योजना (ग्रामीण) व शबरी आवास योजना (ग्रामीण) यांनाही लागू असेल. या अनुदानांतर्गत साधारण क्षेत्रातील कुटबांना रुपये १७ हजार २८० तर नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रुपये १८ हजार २४० एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

शहरी भागासाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास व शबरी आवास योजनेसाठी लाभाची रक्कम व लाभार्थ्यांची पात्रता यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) याप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ३ लक्ष पर्यंत असावे. घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना अडीच लाख रुपये एवढे अनुदान देण्यात येईल. आजच्या निर्णयामुळे प्रधानमंत्री आवास योजनेतील ग्रामीण भागातील अनुसूचित जातीचे लाभार्थी व रमाई आवास योजनेतील लाभार्थी यांच्यातील अनुदानात तफावत राहणार नाही.

-----o-----

## प्रकल्पांना गायरान जमिनी देण्याबाबत शासनाच्या धोरणात सुधारणा

राज्यातील गायरान म्हणून राखीव (अभिहस्तांकित) ठेवण्यात आलेल्या जमिनी सार्वजनिक प्रयोजन आणि सार्वजनिक सुविधांसाठी देण्यात आल्यास त्या बदल्यात तितक्याच किंमतीची दुप्पट क्षेत्रफळाची पर्यायी जमीन गायरान म्हणून वापरासाठी त्याच गावात उपलब्ध करून देण्याची तरतूद असलेले कलम महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२ मध्ये समाविष्ट करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे प्रकल्पांसाठी जमीन उपलब्ध होण्याची प्रक्रिया आता सुलभ होणार आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रत्येक गावामध्ये गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरासाठी गावातील एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी काही जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव ठेवण्यात येते. या जमिनी संबंधित ग्रामपंचायतींकडे सोपविण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२ नुसार विशेष कारणांसाठी बिनभोगवट्याच्या जमिनीचे अभिहस्तांकन करण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसार गावातील भोगवट्यात नसलेल्या जमिनी गावातील गुरांचे मोफत कुरण, राखीव गवत, वैरण, गावठाण, मळणी इत्यादी सार्वजनिक वापरासाठी देण्यात आलेल्या असतात. त्यापैकी मोफत कुरण अथवा राखीव गवत-वैरणीसाठी देण्यात आलेल्या जमिनींना गायरान जमीन म्हणून संबोधण्यात येते. अनेक ठिकाणी अशा जमिनींवर अतिक्रमणे होतात किंवा अनधिकृतरित्या ग्रामपंचायतींकडून व्यापारी स्वरुपाचा वापर केला जातो. याबाबतच्या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने प्रतिबंधात्मक आदेश दिले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने गायरान जमिनीच्या वापराबाबत सर्व यंत्रणांना सविस्तर आदेश दिले असून कोणत्याही खाजगी व्यक्ती अथवा संस्थेस गायरान जमिनी किंवा सार्वजनिक वापरासाठी अभिहस्तांकित केलेल्या जमिनीचे वाटप करू नये असे स्पष्ट केले आहे. मात्र, या धोरणानुसार जमीन महसूल संहितेत सुधारणा करणे गरजेचे होते. तसेच राज्यात राबविण्यात येणाऱ्या शासकीय अथवा अशासकीय संस्थांच्या प्रकल्पांसाठी तसेच सार्वजनिक प्रयोजनासाठीच्या विकास कामांसाठी अनेकदा अपरिहार्यपणे गायरान जमिनी ताब्यात घेणे आवश्यक ठरते. ही प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी आज मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला.

या संहितेत कलम २२ नंतर कलम २२ (क) हे नव्याने समाविष्ट करण्यात येणार असून त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना गायरान म्हणून अभिहस्तांकित केलेली शासकीय जमीन काही विशिष्ट परिस्थितीत प्रकल्पांसाठी भाडेपट्टयाने अथवा कब्जेहक्काने देता येणार आहे. त्यासाठी काही अटी निश्चित केलेल्या आहेत. त्यानुसार अशी जमीन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी केंद्र अथवा राज्य शासनास किंवा त्यांच्या कोणत्याही वैधारिक प्राधिकरणास आवश्यकता असल्यास प्रदान करता येणार आहे. मात्र, ज्या खाजगी प्रकल्पासाठी ती देण्यात येईल त्या प्रकल्पाच्या प्रवर्तकाकडून अशा जमिनीच्या क्षेत्राच्या किमान दुप्पट क्षेत्रफळाची आणि तिच्या किंमतीइतकी जमीन त्याच गावात देणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशी प्राप्त झालेली जमीन गायरान म्हणूनच वापरण्यात येईल. प्रकल्पांसाठी गायरान जमिनींच्या आवश्यकतेची अपरिहार्यता विभागीय आयुक्तांच्या सल्ल्याने राज्य शासन तपासून पाहील.

-----o-----

भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने जमिनी

## इमारतीच्या बांधकामास मुदतवाढीसाठी
## शासनाचे धोरण निश्चित

विविध व्यक्ती अथवा संस्थांना कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतींच्या बांधकामासाठी मुदतवाढ देण्याबाबत आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत धोरण निश्चित करण्याच्या निर्णयास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार यापुढे मुदतवाढ देताना भरीव स्वरुपाचे अधिमूल्य आकारण्यात येणार असल्याने जमिनींचा विकास जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच त्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ लागू होण्यापूर्वी राज्यातील शासकीय जमिनी विविध व्यक्ती, संस्था अथवा कंपनी यांना विविध प्रयोजनासाठी कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने देण्यात आलेले आहेत. तसेच १९६६ ची जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल नियम १९७१ लागू झाल्यानंतर त्यातील तरतुदीनुसारही अशा पद्धतीने जमिनी देण्यात आलेल्या आहेत. या जमिनी ज्या उद्देशाने देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार त्यांचा वापर होऊन राज्याचा विकास व्हावा यासाठी विशिष्ट कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. संबंधितास जमीन प्राप्त झाल्यापासून तीन वर्षाच्या आत अथवा जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आलेल्या मुदतीत तिच्यावर कायमस्वरुपी इमारत उभारणे आवश्यक आहे. ती न झाल्यास भोगवटा किंमतीपेक्षा कमी नुकसान भरपाई दिल्यानंतर ही जमीन परत घेतली जाण्यास पात्र असेल अशी तरतूद जमीन महसूल नियमात करण्यात आली होती. ही तरतूद पुरेशी स्पष्ट नसल्याने जास्तीत जास्त किती कालावधीसाठी आणि किती वेळा मुदतवाढ द्यावी याबाबत संभ्रम होता. तसेच आकारण्यात येणारे अधिमुल्य अत्यंत नगण्य स्वरुपाचे होते. परिणामी लोक याबाबतच्या कार्यवाहीस दिरंगाई करीत होते. त्यामुळे याबाबत धोरण ठरविणे आवश्यक होते. त्यानुसार आज निर्णय घेण्यात आला.

प्रत्यक्ष जमिनीचा ताबा घेतल्यापासून तीन वर्षाच्या आत इमारत बांधकाम करण्यात यावे, इमारतीचे बांधकाम न झाल्यास त्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडून मुदतवाढ प्राप्त करून घ्यावी, ही मुदतवाढ प्राप्त करताना प्रत्येक वेळी अधिमुल्य आकारण्यात येणार आहे. त्यात मूळ मंजूर कालावधीनंतर पहिली मुदतवाढ दोन वर्षांसाठी असणार असून त्यात वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणाऱ्या संबंधित जमिनीच्या किंमतीच्या दोन टक्के इतकी रक्कम प्रतिवर्ष भरावी लागणार आहे. त्यानंतर दुसरी मुदतवाढ देताना ही रक्कम तीन टक्के, तिसरी मुदतवाढ देताना पाच टक्के, चौथी मुदतवाढ देताना ७ टक्के आणि पाचवी मुदतवाढ देताना दहा टक्के इतके अधिमुल्य आकारण्यात येणार आहे. या सर्व मुदतवाढी दोन वर्षे कालावधीसाठी असतील, ते देण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना असतील. मुदतवाढीचे कारण संबंधित जमीनधारकाच्या आवाक्याबाहेरील असल्याची जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाल्यास या दराच्या निम्मे दर आकारण्यात येतील.

नवीन तरतुदीप्रमाणे मुदतवाढ दिल्यानंतरही बांधकाम न झाल्यास देण्यात आलेली जमीन शासन जमा करण्यात येऊन भोगवटा किंमतीपेक्षा कमी रक्कमेइतकी नुकसानभरपाई धारकास दिली जाईल. यासोबतच या संपूर्ण प्रक्रियेतील अधिमुल्याची आकारणी आता सुटसुटीत आणि सुलभ करण्यात आली आहे.

-----०-----

## महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी प्रकल्पग्रस्तांना उपलब्ध करून देण्यास मान्यता

राष्ट्रीय व राज्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी खासगी जमिनींचे संपादन करताना विरोध होतो. त्यामुळे लोकहितकारी प्रकल्पांची उभारणी लांबणीवर पडून त्यांच्या खर्चात मोठी वाढ होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार निश्चित करेल अशा प्रकल्पांच्या प्रकल्पग्रस्तांचे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमिनीवर पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र शेत जमीन अधिनियमात सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्य शासनाला विविध सार्वजनिक प्रकल्पांसाठी भूसंपादन करावे लागते. त्याला बऱ्याचदा खासगी जमीनधारकांचा विरोध झाल्यामुळे या प्रकल्पांना विलंब लागतो. महाराष्ट्र शेती महामंडळ हे राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम असून या महामंडळाला प्रदान करण्यात आलेल्या जमिनींपैकी बहुतांश जमिनी या महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ अन्वये अतिरिक्त ठरलेल्या जमिनी आहेत. सध्या महामंडळाकडे ६८ हजार ८२६ एकर शेतजमीन असून त्यापैकी २६ हजार ५०९ एकर क्षेत्र माजी खंडकरी यांना वाटपासाठी प्रस्तावित केलेले आहे. या क्षेत्रापैकी बऱ्याचशा क्षेत्राचे वाटप करण्यात आले असून हे क्षेत्र वगळता अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यातील एकूण उर्वरित ४२ हजार ३१६ एकर क्षेत्र महामंडळाकडे शिल्लक आहे. ही जमीन राज्य शासन अधिसूचित करेल अशा सार्वजनिक प्रकल्पबाधितांना पर्यायी शेतजमीन म्हणून त्यांच्या पसंतीनुसार वाटप करणे शक्य होण्यासाठी महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ च्या कलम २८-१AA च्या पोटकलम (३A) मध्ये सुधारणा करण्यास आज मान्यता देण्यात आली.

-----०-----

**नागपूर सुधार प्रन्यासच्या बरखास्तीस मान्यता**

नागपूर शहर आणि सभोवातलच्या महानगर क्षेत्राच्या विकासासाठी नागपूर महानगर प्रदेश क्षेत्र प्राधिकरण अस्तित्वात आल्याने नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगरपालिका यांच्यासह एकूण तीन विकास प्राधिकरणे शहरात कार्यरत झाली होती. यामुळे नागरिकांना त्यांची कामे करताना निर्माण होणारा संभ्रम टाळण्याच्या दृष्टीने नागपूर सुधार प्रन्यास हे विकास प्राधिकरण बरखास्त करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

नागपूर शहर व नागपूर महानगर क्षेत्राच्या संतुलित विकासासाठी नागपूर सुधार प्रन्यास हे विकास प्राधिकरण कार्यरत आहे. नागपूर शहरातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नागपूर सुधार प्रन्यास १९३६ मधील तरतुदीनुसार तत्कालीन मध्यवर्ती प्रांताच्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्याप्रमाणे २५ डिसेंबर १९३६ रोजी अस्तित्वात आले होते.

नागपूर महानगर क्षेत्राच्या संतुलित व नियोजनबद्ध विकासासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अस्तित्वात आल्यानंतर शहराच्या विकासासासाठी नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अशी तीन विकास प्राधिकरणे अस्तित्वात असतील. ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्यांची कामे करताना ती नेमक्या कोणत्या प्राधिकरणांतर्गत येतात याबद्दल संभ्रम निर्माण होईल. यामुळे महानगर क्षेत्रासाठी एकच विकास प्राधिकरण असावे अशी मागणी सातत्याने लोकप्रतिनिधींकडून केली जात होती. त्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका ही यंत्रणा तसेच महानगरपालिका क्षेत्राबाहेरील महानगर परिसरासाठी प्रस्तावित नागपर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राहणार असल्याने नागपूर सुधार प्रन्यासची आवश्यकता राहणार नाही. हे लक्षात घेऊन नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्याचा निर्णय आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

नागपूर सुधार प्रन्यासकडील मत्ता आणि दायित्वांचे क्रमशः हस्तांतरण नागपूर महानगरपालिका तसेच नागपूर महानगर विकास प्राधिकरणाकडे एक वर्षाच्या कालावधीत करण्यात येईल. तसेच मत्ता आणि दायित्व कोणत्या प्राधिकरणास किती प्रमाणात असावे याबाबतचा निर्णय घेण्यासाठी नगरविकास विभागाचे सचिव, नागपूर महानगर पालिका आयुक्त आणि नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्ष यांची समिती शासनाद्वारे नेमण्यात आली असून या समितीकडून नागपूर महानगरपालिका तसेच नागपूर महानगर विकास प्राधिकरणास हस्तांतरित करावयाच्या मत्ता आणि दायित्वाबद्दलची शिफारस राज्यशासनास केली जाईल.

-----०-----

दिग्रसच्या आठवले सूतगिरणीची अर्थसहाय्यासाठी निवड

## सूतगिरण्यांच्या मान्यतेसंदर्भात सुधारित धोरणासाठी वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन्याचे निर्देश

दिग्रस (जि. यवतमाळ) येथील रामदास आठवले मागासवर्गीय कापूस उत्पादक शेतकरी सहकारी सूतगिरणीला बाराव्या पंचवार्षिक योजनेमधून अर्थसहाय्य करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. तसेच सहकारी सूतगिरण्यांच्या नोंदणीस मान्यता देण्यासंदर्भात सुधारित धोरण ठरविण्यासाठी वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याबाबत यावेळी निर्देश देण्यात आले.

सहकारी सूतगिरण्यांच्या स्थापनेसाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे शासकीय भागभांडवल मंजूर करण्याची योजना राबविण्यात येते. त्याअंतर्गत मागासवर्गीय सूतगिरणीसाठी सभासद भांडवल पाच टक्के, शासकीय भागभांडवल ४५ टक्के आणि शासकीय कर्ज ५० टक्के याप्रमाणे अर्थसहाय्य करण्यात येते. आकृतीबंधानुसार ५० टक्के कर्जासाठी समाजकल्याण विभागामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सूत गिरण्यांनी जमा करावयाच्या ५ टक्के सभासद भागभांडवलापैकी मागासवर्गीय सभासदांना सूतगिरण्यांचे शेअर्स खरेदी करण्यासाठी दोन हजार रुपयांच्या शेअर मागे अठराशे रुपयांचे (९० टक्के) अनुदान दिले जाते. रामदास आठवले सूतगिरणीची प्रकल्प किंमत ६१ कोटी ७४ लाख रूपये असून ५:४५:५० या आकृतीबंधाप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

“जेथे कापूस तेथे कापड निर्मिती” हे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. त्यामुळे जळगाव, यवतमाळ, औरंगाबाद, जालना, परभणी, बुलडाणा, नांदेड, अमरावती व बीड या कापूस उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यातील ८० टक्के सूतगिरण्या शासकीय अर्थसहाय्यासाठी निवडण्यात येत आहेत. या धोरणानुसारच दिग्रसच्या सूतगिरणीची अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली आहे.

दिग्रस (जि. यवतमाळ) येथील सिद्धेश्वर सहकारी सुतगिरणीच्या नावात बदल करून या गिरणीचे नाव रामदास आठवले मागासवर्गीय कापूस उत्पादक शेतकरी सहकारी सूतगिरणी असे करण्यात आले आहे.

-----०-----

## नर्सिंग अभ्यासक्रमासाठी नव्या पदांची नियुक्ती समितीद्वारे करण्यास मान्यता

परिचर्या महाविद्यालयात नव्याने निर्माण करण्यात आलेल्या ४१ शैक्षणिक पदांपैकी पाठ्यनिर्देशक हे पद वगळून उर्वरित सर्व व रिक्त असलेली पदे तातडीने भरणे आवश्यक असल्याने ती लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून एक वर्षासाठी वगळून त्यांच्या भरतीसाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

नवी दिल्ली येथील भारतीय परिचर्या परिषदेच्या सूचनेनुसार राज्य शासनाने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत जनरल नर्सिंग व मिडवायफरी अभ्यासक्रमाच्या राज्यात कार्यरत असलेल्या १० शाळांपैकी दोन शाळांचे मिडवायफरीमधून परिचर्या महाविद्यालयात रुपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार एका महाविद्यालयात ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे बी. एस्सी. (नर्सिंग) पदवी अभ्यासक्रम तसेच दुसऱ्या महाविद्यालयात ५० विद्यार्थी क्षमतेचे बी. एस्सी. (नर्सिंग) व २५ विद्यार्थी क्षमतेचे एम.एस्सी (नर्सिंग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याबाबातचा त्यात समावेश आहे. परंतु या परिचर्या महाविद्यालयामध्ये भारतीय परिचर्या परिषदेनुसार आवश्यक शैक्षणिक संवर्गातील पदे मंजूर नसल्याने २०१४ मध्ये ४१ शैक्षणिक व ३ अशैक्षणिक पदे मंजूर करण्यात आली आहेत. यामध्ये प्राध्यापक नि प्राचार्य (४), प्राध्यापक नि उपप्राचार्य (५) सहयोगी प्राध्यापक (९), अधिव्याख्याता (१५), पाठ्यनेशाक/चिकित्सालयीन निर्देशाक (८), वसतीगृह अधिक्षिका (३) या पदांचा समावेश आहे.

यापूर्वी पदविका अभ्यासक्रम शिकवित असलेल्या परंतु ज्यांच्याकडे एमस्सी (नर्सिंग) ही अर्हता असलेल्या ज्येष्ठतम् पाठ्यनिर्देशकांनाच प्राचार्य, उपप्राचार्य, सहयोगी प्राध्यापक व अधिव्याख्याता या पदनामाने संबोधून त्यांच्याकडून अध्यापकाचे काम करून घेण्यात येत असे. मात्र, त्यांना अनुदेय वेतन मात्र दिले जात नाही. त्यामुळे या पदांची तातडीने नियुक्ती करण्यात यावी अशी भारतीय परिचर्या परिषदेकडून सूचना होती. त्यामुळे प्राचार्य, प्राध्यापक नि उपप्राचार्य (५) सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता या मंजूर पदांसोबत मुंबईच्या परिचर्या शिक्षण संस्थेतील रिक्त, प्राध्यापक (२), अधिव्याख्याता (३) अशा पाच पदांसह एकूण ३८ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून एक वर्षासाठी वगळण्याचा निर्णय घेऊन ही पदे भरण्यासाठी नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. ही समिती सामाईक परीक्षा अथवा मुलाखत घेऊन भारतीय परिचर्या परिषदेने निर्धारित केलेली शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांची निवड करेल.

-----०-----